महाराष्ट्र शासन

क्र. माशास्थ-२०१२/(२९/१२/ माशि -१
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई. ४०० ०३२
दिनांक:- २७ / ०७ / २०१२.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई विभाग, मुंबई.

विषय:- माध्यमिक शाळेच्या स्थलांतरास परवानगी बाबत.
सहारा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद संचलित
माध्यमिक विद्यालय मासले, ता.मुरबाड, जि.ठाणे.
संदर्भ:- आपले क्र.शिउसं/माध्य-४/२०१२/१११८-१९,
दि: २३/०५/२०१२ चे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत आपले संदर्भीय पत्राचे कृपया अवलोकन करावे.

२. प्रस्तूत प्रकरणी सहारा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद संचलित माध्यमिक विद्यालय मासले, ता.मुरबाड, जि.ठाणे या शाळेचे २० कि.मी.अंतरावर असलेल्या सरळगांव ता.मुरबाड जि.ठाणे येथे स्थलांतरास सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासून खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीवर स्थलांतर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) स्थलांतरित केलेल्या माध्यमिक शाळेतील कोणत्याही वर्गासाठी कोणत्याही कारणास्तव सरासरी हजेरीची अट शिथिल केली जाणार नाही.

२) माध्यमिक विद्यालय मासले, ता.मुरबाड, जि.ठाणे या माध्यमिक शाळेतील सर्व पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना स्थलांतरित केलेल्या शाळेच्या ठिकाणी सामावून घेतले जाईल.

३) स्थलांतरित ठिकाणी माध्यमिक शाळेसाठी लागणारी आवश्यक भौतिक व शैक्षणिक सुविधा यांची पूर्तता केली जाईल.

४) यासाठी पालक/शिक्षक समिती यांची स्थलांतरास सहमती असावी व स्थलांतरामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

५) शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणारे सर्व नियमांचे पालन करणे संस्थेच्या शाळेस बंधनकारक असतील.

याबाबत पुढील तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा उलट टपाली अहवाल शासनास सादर करावा.

(सु.न.जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत, आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

१) शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) विभागीय शिक्षण उप संचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, ठाणे
४) सचिव, सहारा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद
५) निवड नस्ती माशि-१.